दै. देशोन्नती दि. 03-01-2025

# अखेर 'ते' बॅनर ग्रामीण पोलिसांनी हटविले; गुन्हा दाखल

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अनधिकृत बॅनर विरोधात दिलेल्या कारवाईनुसार नांदेड ग्रामीण पोलिसांनी दूधडेअरीजवळ लावलेले अनधिकृत बॅनर हटवून गुन्हा दाखल केला आहे.

ढवळे कॉर्नर ते दूधडेअरी दरम्यान मार्गावर वीज वितरण कंपनीच्या खांबावर अनधिकृत बॅनर लावण्यात आले होते. यावेळी ग्रामीण ठाण्याचे पोनि



ओमकांत चिंचोलकर यांनी सदर बॅनर विनापरवाना लावल्याची खात्री केल्यानंतर पोलिस कर्मचाऱ्यांच्या वतीने तीन बॅनर हटविण्यात आले. यावेळी बॅनर लावणारा शेख आदील शेख शकिल यास ताब्यात घेतले असून या प्रकरणी पोउपनि बाबुराव चव्हाण यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दै. देशोन्नती दि. 03-01-2025

# पोलीस स्थापना दिनानिमित्त दौड

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** नांदेड पोलीस दलातर्फे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 'रेजिंग डे' साजरा केला जात आहे. २ ते ८ जानेवारी दरम्यान वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. त्याचा भाग म्हणुन आज २ जानेवारी रोजी सकाळी ७ ते ८ वाजताच्या दरम्यान पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या नेतृत्वाखाली दौडचे आयोजन करण्यात आले होते.

सदर दौडला पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी हिरवी झेंडी दाखवुन दौडला सुरूवात केली. शहरातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी व शाखा प्रभारी तसेच क्युआरटी, आरसीपी, पोलीस मुख्यालय येथील अंमलदार, तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तसेच न्यु फोर्स अॅकडमीचे विद्यार्थ्यांसोबतच पोलीस मित्र आणि वेगवेगळ्या महाविद्यालयाचे तरूण यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. सदरची दौड ही पोलीस अधिक्षक कार्यालय येथुन सुरू होवुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, गुरूद्वारा चौक, वजिराबाद चौक, तिरंगा चौक, पोलीस मुख्यालय, नांदेड येथे दौड संपन्न झाली. या प्रसंगी पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी दौडमध्ये स्वतः भाग घेऊन तरूणांना पोलीस दलाचे कामाजाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.